| | |
|---|---|
| MHPU320002472022 | दाखल तारीख – ०५/०२/२०२२ |
| | नोंदणी तारीख – ११/०२/२०२२ |
| | निकाल तारीख – ०७/०७/२०२६ |
| | कालावधी – ०४ वर्षे,०५ महिने,०२ दिवस |

**३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर इंदापूर यांच्या न्यायालयात,**

**ता.इंदापूर, जिल्हा पुणे.**

**(पिठासीन अधिकारी – प्राजक्ता राजीव सबनीस)**

| | |
|---|---|
| **नियमित दिवाणी दावा क्रमांक** | ६६/२०२२ |
| **निशाणी क्रमांक** | ७० |

| | |
|---|---|
| अजितकुमार विष्णू थोरात,<br>वय– ५१ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>रा.थोरातवाडी, ता.इंदापूर, जि.पुणे | **वादी** |
| **विरुध्द** | |
| प्रशांत मारुती तनपुरे,<br>वय– ५० वर्षे, व्यवसाय– शेती,<br>रा.थोरातवाडी, ता.इंदापूर, जि.पुणे. | **प्रतिवादी** |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2026.07.07 17:32:49 +0530

**दावा – निरंतर मनाईचा**

| | |
|---|---|
| वादीतर्फे वकील | श्री.टी.बी.देवकर |
| प्रतिवादीतर्फे वकील | श्री.एस.सी.शिंदे |

# न्यायनिर्णय

## (निकाल घोषित तारीख ०७/०७/२०२६)

सदरचा दावा वादीने निरंतर मनाईकरिता दाखल केला आहे.

०२. **दावा मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे–**

तुकडी पुणे, पोट तुकडी व तालुका इंदापूर, दुय्यम निबंधक, इंदापूर, जि.पुणे यांच्या हद्दीतील गाव मौजे थोरातवाडी येथील शेतजमीन मिळकत खालीलप्रमाणे–

| गट नंबर | क्षेत्र | | आकार | | चतुःसिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | हे. | आर. | रु. | पै. | पुर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १८९/१ | ५ | २८ | १३ | ५० | रस्ता | ओढा | गट नं.१७४ | गट नं. ११८/२, ११९/१, २ |

येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक शेतजमीन मिळकत प्रस्तुत दाव्याचा वाद विषय आहे. (या मिळकतीस सोईकरीता **'दावा मिळकत'** असे संबोधण्यात येते.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2026.07.07 17:32:58 +0530

०३. **वादीचे दाव्यातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –**

दावा मिळकतीचा जुना सर्वे नं.१५१ होता. दि.०६/१०/१९५१ रोजी वादीचे वडिल विष्णू नामदेव थोरात यांनी प्रतिवादीचे पुर्वाधिकारी कृष्णाबाई मारुती तनपुरे यांच्याकडून दावा मिळकत नोंदणीकृत भाडेपट्ट्याने ताब्यात घेतली होती. दि.०१/०६/१९८८ रोजी वादीचे वडिल मयत झाले. वादीचे वडिल मयत होईपर्यंत ते दावा मिळकत कुळ हक्काने वहिवाटीत होते. वादीचे वडिल हे प्रतिवादी व त्याच्या पुर्वाधिकाऱ्यांस वेळोवेळी खंड देत होते. वादी व प्रतिवादी यांच्या पुर्वाधिकाऱ्यांमध्ये कुळ कायद्यांतर्गत खटले, दावे व अपील झाले होते. परंतु त्या सर्वांचे निकाल हे वादी व

त्याच्या पुर्वाधिकाऱ्यांच्या बाजुने झालेले आहे. वादीने तहसिलदार इंदापूर यांच्या न्यायालयात कुळ कायदा कलम ३२ग प्रमाणे अर्ज दाखल केला असुन तो अद्याप प्रलंबित आहे.

वादी व त्याचे पुर्वाधिकारी हे सन १९५१ पासून दावा मिळकत वहिवाटून त्यातून ऊस, मका, ज्वारी, गहू, बाजरी अशी पिके घेत आहेत. वादी व त्याच्या पुर्वाधिकाऱ्यांचा दावा मिळकतीतील ऊस छत्रपती सहकारी साखर कारखाना भवानीनगर येथे जात होता व आहे. दावा मिळकतीतील विहीरीवर वादीच्या वडिलांनी विद्युत जोड घेतला असुन त्यावरुन दावा मिळकतीचे क्षेत्र ओलीताखाली आणलेले आहे.

दावा मिळकतीतील २ हेक्टर ऊस तोडणीस आलेला असुन तो गळीतासाठी जाणार आहे. सदर ऊस पिकाशी प्रतिवादीचा काहीही संबंध नाही. परंतु दि.१९/०१/२०२२ रोजी प्रतिवादीने दावा मिळकतीतील ऊस स्वतःच्या नावावर करण्याकरिता अर्ज दिला. दि.१४/०१/२०२२ रोजी वादी दावा मिळकतीत नांगरट करत असताना त्यास प्रतिवादीने हरकत अडथळा केला. तसेच दि.३०/०१/२०२२ रोजी वादी ऊसाच्या पिकास पाणी देत असताना देखील प्रतिवादीने त्यास हरकत अडथळा केला. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा दावा दाखल करुन प्रतिवादीने वादीच्या दावा मिळकतीतील वहिवाटीस हरकत अडथळा करु नये अगर बोजा निर्माण करु नये अशी निरंतर मनाईची मागणी केली आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2026.07.07 17:33:10 +0530

**०४. <u>प्रतिवादीने निशाणी १४ येथे कैफियत दाखल केली आहे त्यातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे–</u>**

दावा मिळकत ही प्रतिवादीच्या मालकी वहिवाटीची मिळकत आहे. सन १९९० मध्ये फेरफार नं.३७८ अन्वये दावा मिळकतीस प्रतिवादीची नोंद झाली आहे. दावा मिळकतीत प्रतिवादी मका, ऊस, गहू अशी पिके घेतो. प्रतिवादीने दावा

मिळकतीत दोन विहीरी खोदल्या असुन दावा मिळकत लागवडीयोग्य करण्याकरिता कर्ज काढून बराच खर्च केला आहे. वादीस प्रस्तुत दावा दाखल करण्याचे कोणतेही कारण घडलेले नाही. कारण घडलेल्या दिवशी तक्रार केल्याचा कागदोपत्री पुरावा देखील वादीने दाखल केलेला नाही. दावा मिळकतीतील ऊस हा प्रतिवादीच्या मालकीचा असल्याने प्रतिवादीने त्या ऊस पिकास पाणी घालण्यास वादीस हरकत अडथळा करण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. प्रतिवादीने दाखल केलेले टेनन्सी रिवीजन नं.२०/२०१० चा निकाल प्रतिवादीच्या बाजुने लागला आहे. वादीने तहसिलदार इंदापूर यांच्याकडे दाखल केलेले केस नं.२/२००७ व बारामती येथील प्रांत अधिकारी यांच्याकडे दाखल केलेले अपील नं.१३/२००८ यातील निकाल कमिशनर यांनी रद्द ठरविले आहेत. दावा मिळकतीत वादीचा कोणताही अधिकार नसल्याने दावा फेटाळण्यात यावा व प्रतिवादीस नुकसान भरपाईची रक्कम रु.५०,०००/– देण्यात यावी अशी प्रतिवादीने विनंती केली आहे.

**०५.** माझे पुर्वाधिकारी यांनी निशाणी ३६ येथे मुद्दे नोंदविले आहेत. सदर मुद्दे व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंद करते.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | वादी हे सिद्ध करतो काय की, दावा मिळकतीत त्याची कब्जेवहिवाट आहे? | **होकारार्थी** |
| **२.** | वादी हे सिद्ध करतो काय की, दावा मिळकतीतील त्याच्या वहिवाटीस प्रतिवादी हरकत अडथळा करतो? | **होकारार्थी** |
| **३.** | वादी निरंतर मनाईची दाद मिळण्यास पात्र आहे का? | **अंशतः होकारार्थी** |
| **४.** | आदेश व हुकूम काय? | **अंतिम** |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2026.07.07 17:33:18 +0530

| | | |
|---|---|---|
| | | **आदेशाप्रमाणे** |

## कारणमीमांसा

**०६. वादीने खालील तोंडी पुरावा दाखल केला आहे.**

| अ.क्र | साक्षीदाराचे नाव | साक्षीदार प्रकार | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | अजितकुमार विष्णू थोरात | वादी | ३७ |

**०७. वादीने खालील कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे.**

| अ.क्र. | कागदोपत्री पुरावा | निशाणी |
|---|---|---|
| १. | अप्पर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण यांच्याकडील केस नं.११/८१ चा निकाल | ४० |
| २. | फेरफार नं.२८० | ४१ |
| ३. | अप्पर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण यांच्याकडील केस नं.७/९५ चा निकाल | ४२ |
| ४. | टेनन्सी अपील नं.३०/९५ चा निकाल | ४३ |
| ५. | दावा मिळकतीचा ७/१२ उतारे | ४४ व ४७ |

**०८. प्रतिवादीने खालील तोंडी पुरावा दाखल केला आहे.**

| अ.क्र | साक्षीदाराचे नाव | साक्षीदार प्रकार | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | प्रशांत मारुती तनपुरे | प्रतिवादी | ५८ |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2026.07.07 17:33:25 +0530

**०९. प्रतिवादीने खालील कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे.**

| **अ.क्र.** | **कागदोपत्री पुरावा** | **निशाणी** |
|---|---|---|
| **१.** | खाते क्र.६३ चा उतारा | ६४ |
| **२.** | दावा मिळकतीचा ७/१२ उतारा | ६५ |
| **३.** | जमीन महसुलाची पावती | ६६ |

**१०.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्र.१ करीता –**

**११.** सदर मुद्याकरिता दावा मिळकतीत वादीची कब्जेवहिवाट आहे का? हे पाहणे आवश्यक आहे.

**१२.** वादीने त्याच्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात दाव्यातील कथनांना अनुसरुन असे कथन केले की, दि.०६/१०/१९५१ रोजी दावा मिळकत ही नोंदणीकृत भाडेपट्ट्याने वादीचे वडिल विष्णू नामदेव थोरात यांनी प्रतिवादीचे पुर्वाधिकारी कृष्णाबाई मारुती तनपुरे यांच्याकडून घेतली होती. सन १९५१ पासून ते दि.०१/०६/१९८८ पर्यंत म्हणजेच विष्णू थोरात मयत होईपर्यंत दावा मिळकतीत त्यांची कुळ हक्काने वहिवाट होती. सन १९८८ नंतर विष्णू यांच्या पश्चात वादीची दावा मिळकतीत वहिवाट आहे. दावा मिळकतीत वादीने ऊस, मका, ज्वारी इत्यादी पिके घेतली आहेत. दावा मिळकतीतील वादीचा ऊस छत्रपती सहकारी साखर कारखाना भवानीनगर येथे जात होता व आहे. दावा मिळकतीतील विहीरीवर वादीच्या वडिलांनी विद्युत जोड घेतला असुन दावा मिळकतीचे क्षेत्र ओलीताखाली आणले आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2026.07.07 17:33:33 +0530

**१३.** याउलट प्रतिवादीने त्याच्या सरतपासात असे कथन केले की, दावा मिळकत ही प्रतिवादीच्या मालकी वहिवाटीची मिळकत असुन दावा मिळकतीत

प्रतिवादी हा मका, ऊस, गहू अशी पिके घेतो. प्रतिवादीने दावा मिळकतीत दोन विहीरी खोदल्या असुन दावा मिळकत लागवडीयोग्य केली आहे. सद्या दावा मिळकतीत असलेले ऊसाचे पिक हे देखील प्रतिवादीच्या मालकीचे आहे. वादी व प्रतिवादी यांच्या पुराव्यातील कथने पाहता दावा मिळकतीचा मालकी हक्क प्रतिवादीचा असल्याचे वादीने नाकारलेले नाही. परंतु वादी हा दावा मिळकतीवरील त्याचा कब्जा कुळ हक्काने प्रस्थापित करीत आहे. वादीने प्रस्तुतचा दावा हा निरंतर मनाईकरिता दाखल केल्याने दावा मिळकतीत वादीचा कब्जा आहे हे शाबीत करण्याची जबाबदारी वादीची आहे. त्याकरिता दाखल करण्यात आलेल्या कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन करण्यात येते.

**१४.** वादी ज्या दि.०६/१०/१९५१ रोजीच्या नोंदणीकृत भाडेपट्टयाने दावा मिळकतीवरील त्याचा कब्जा प्रस्थापित करु पाहत आहे तो भाडेपट्टा वादीने दाव्यात दाखल केलेला नाही. परंतु प्रतिवादीच्या उलटतपासाचे अवलोकन करता प्रतिवादीने उलटतपासात हे मान्य केले की, दि.०६/१०/१९५१ रोजी वादीचे वडिल विष्णू थोरात यांनी दावा मिळकत नोंदणीकृत भाडेपट्टयाने प्रतिवादीचे पुर्वाधिकारी कृष्णाबाई तनपुरे यांच्याकडून घेतली होती. दि.०६/१०/१९५१ रोजीच्या भाडेपट्टयाने दावा मिळकतीचा कब्जा वादीच्या वडिलांना दिल्याचे प्रतिवादीस मान्य आहे. त्यामुळे भारतीय पुरावा कायदा, कलम ५८ नुसार मान्य कथने शाबीत करण्याची आवश्यकता नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2026.07.07 17:33:45 +0530

**१५.** वादीचे असे कथन आहे की, सन १९५१ पासून ते सन १९८८ पर्यंत दावा मिळकतीत विष्णू थोरात यांचा कब्जा होता. प्रतिवादीने देखील उलटतपासात हे मान्य केले की, दावा मिळकत ही सन १९५१ पासून विष्णू थोरात यांच्या ताब्यात त्यांच्या हयातीपर्यंत होती. वादीचे पुढे असे कथन आहे की, सन १९८८ मध्ये विष्णू मयत झाल्यानंतर दावा मिळकतीत आजतागायत वादीचा कब्जा आहे. परंतु संगणकीय ७/१२ उताऱ्यांवर पिकांची नोंदवही सदरात वादीचे नाव नोंद झालेले नाही. या मुद्यावर

प्रतिवादीचे असे कथन आहे की, दावा मिळकतीत प्रतिवादीचाच कब्जा आहे.

**१६.** वादीने दाखल केलेल्या सन १९७३ ते सन १९८७ पर्यंतच्या दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर पिकांची नोंदवही सदरात जमीन करणाऱ्याचे नाव म्हणून वादीचे वडिल विष्णू थोरात यांची नोंद आहे. तसेच सन १९८८ ते सन २००५ पर्यंतच्या पिकांची नोंदवही सदरात जमीन करणाऱ्याचे नाव म्हणून वादीचे नाव नोंद आहे. प्रतिवादीने सन १९७३ ते सन २००५ पर्यंत विष्णू थोरात अगर वादीचे नाव दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर पिकांची नोंदवही सदरात नोंद आहे म्हणून कोणतीही हरकत उपस्थित केलेली नाही. त्यामुळे सन १९७३ ते सन २००५ पर्यंत दावा मिळकतीवरील विष्णू थोरात व त्यांच्या पश्चात वादीचा कब्जा शाबीत होतो.

**१७.** वादीने सन २०१६ ते सन २०१९ पर्यंतचा दावा मिळकतीचा ७/१२ उतारा व प्रतिवादीने सन २०२० ते सन २०२३ पर्यंतचा दावा मिळकतीचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. सदरचे दोन्ही उतारे संगणकीय असुन त्या उताऱ्यांवरील पिकांची नोंदवही सदरात वादीचे नाव दिसून येत नाही. परंतु त्या ७/१२ उताऱ्यांवरील पिकांची नोंदवही सदरात जमीन करणाऱ्याचे नाव असा रकानाच नसल्याने त्यावर वादीचे नाव नोंद असण्याची कोणतीही शक्यता नाही. त्याचप्रमाणे सन २००५ नंतर प्रतिवादीने दावा मिळकतीतील वादीचा कब्जा काढून घेतला आहे असे दाखविणारा देखील कोणताही पुरावा प्रतिवादीने दाखल केलेला नाही. त्यामुळे संगणकीय ७/१२ उताऱ्यांवर वादीचे नाव नोंद नाही म्हणून सन १९५१ पासून दावा मिळकतीत कुळ म्हणून असलेला वादीच्या पुर्वाधिकाऱ्यांचा अगर वादीचा कब्जा नष्ट होत नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2026.07.07 17:33:57 +0530

**१८.** वादीच्या कथनानुसार सद्या दावा मिळकतीत असलेले ऊसाचे पिक हे त्याच्या मालकीचे आहे. याउलट प्रतिवादीचे असे कथन आहे की, सदर ऊस पिकावर केवळ त्याचा अधिकार आहे. परंतु प्रतिवादीने उलटतपासात हे मान्य केले आहे की, सन २०१२ ते सन २०२१ पर्यंत केवळ वादीच्या नावाची नोंद दावा मिळकतीतील

ऊस पिकाकरिता साखर कारखान्याला झाली आहे. प्रतिवादीने हे देखील कबुल केले की, प्रस्तुत दाव्यातील तुर्तातुर्त मनाईचा अर्ज मंजूर झाल्यानंतर देखील दावा मिळकतीतील ऊसाचे पिक हे वादीच्या नावानेच गेले आहे. प्रतिवादीने पुढे अशी कबुली दिली की, दावा मिळकतीतील ऊस त्याच्या अगर त्याच्या आईच्या नावावर कधीही गेला नसुन सन २०२२ नंतर देखील दावा मिळकतीतील ऊस हा वादीच्या नावावरच जात आहे. प्रतिवादीने उलटतपासात दिलेल्या या कबुलींवरुन हे स्पष्ट होते की, दावा मिळकतीतील ऊस पिक हे वादीचे असुन दावा मिळकतीत आजमितीस देखील वादीचाच कब्जा आहे.

**१९.** वादी व प्रतिवादी यांना ही बाब मान्य आहे की, त्यांचे पुर्वाधिकारी व त्यांच्यामध्ये कुळ कायद्यातर्गत अनेक प्रकरणे दाखल होती. वादीने अप्पर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण यांच्याकडील केस नं.११/१९८१ चा निकाल दाखल केला आहे. तो अर्ज प्रतिवादीचे पुर्वाधिकारी कृष्णाबाई तनपुरे यांनी वादीचे वडिल विष्णू थोरात यांच्याविरुद्ध केला असुन तो अर्ज दावा मिळकत ताब्यात मिळण्याकरिता केलेला आहे. सदरचा अर्ज नामंजूर करण्यात आला आहे. वादीने दाखल केलेल्या टेनन्सी केस नं.७/१९९५ चे अवलोकन करता प्रतिवादीने वादीविरुद्ध दावा मिळकतीचा कब्जा मिळण्याकरिता दाखल केलेला अर्ज देखील नामंजूर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे वादीने दाखल केलेल्या टेनन्सी अपील नं.३०/१९९५ चे अवलोकन करता प्रतिवादीने टेनन्सी केस नं.७/१९९५ वरती दाखल केलेले अपील देखील नामंजूर झाल्याचे दिसून येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2026.07.07 17:34:06 +0530

**२०.** प्रतिवादीचे असे कथन आहे की, त्याने टेनन्सी रिव्हीजन नं.२०/२०१० हा दाखल केला असुन त्याचा निकाल प्रतिवादीच्या बाजुने लागला आहे. परंतु प्रतिवादीने टेनन्सी रिव्हीजन नं.२०/२०१० ची कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. त्यामुळे टेनन्सी रिव्हीजन नं.२०/२०१० हा कशाकरिता दाखल केला होता व

त्याचा निकाल काय झाला आहे हे स्पष्ट होत नाही. याउलट वादीने दाखल केलेल्या वर नमुद कागदोपत्री पुराव्यातून हे स्पष्ट होते की, प्रतिवादीचे पुर्वाधिकारी अगर प्रतिवादी यांना कुळ कायद्यातर्गत दाखल असलेल्या कोणत्याही प्रकरणांत दावा मिळकतीचा कब्जा मिळालेला नाही. तसेच प्रतिवादीने दावा मिळकतीच्या कब्जाकरिता वर नमुद प्रकरणे दाखल केली म्हणजेच दावा मिळकतीत प्रतिवादीचा कब्जा नसुन वादीचाच कब्जा आहे हे प्रतिवादीस मान्य आहे हे स्पष्ट होते. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदविते.

## मुद्दा क्र.२ करीता –

**२१.** सदर मुद्याकरिता प्रतिवादी हा दावा मिळकतीतील वादीच्या वहिवाटीस हरकत अडथळा करतो का? हे पाहणे आवश्यक आहे.

**२२.** वादीने त्याच्या सरतपासात असे कथन केले की, दि.१४/०१/२०२२ रोजी तो दावा मिळकत नांगरत असताना प्रतिवादीने त्यास हरकत अडथळा केला तसेच दि.३०/०१/२०२२ रोजी वादी ऊसाच्या पिकास पाणी देत असताना देखील प्रतिवादीने त्यास हरकत अडथळा केला. या मुद्यावर प्रतिवादीचे कथन पाहता हे स्पष्ट आहे की, प्रतिवादी हा दावा मिळकतीतील वादीचा कब्जा नाकारत आहे. तसेच प्रतिवादी हा दावा मिळकतीतील ऊस पिकावर देखील त्याचा अधिकार सांगत आहे. मुद्दा क्र.१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दावा मिळकतीतील वादीची कब्जेवहिवाट वादीने शाबीत केली आहे. अशा परिस्थितीत दावा मिळकतीतील वादीचा कब्जा नाकारणे अगर दावा मिळकतीतील पिकावर स्वतःचा अधिकार सांगणे हा वादीच्या दावा मिळकतीतील अधिकारास हरकत अडथळाच आहे. म्हणून मी मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी नोंदविते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2026.07.07 17:34:16 +0530

## मुद्दा क्र.३ करिता–

**२३.** दावा मिळकतीतील वादीचा कब्जा वादीने शाबीत केला आहे. प्रतिवादी हा दावा मिळकतीतील वादीच्या वहिवाटीस हरकत अडथळा करीत असल्याचे देखील

शाबीत झाले आहे त्यामुळे वादी हा प्रतिवादीविरुद्ध दावा मिळकतीतील वादीच्या वहिवाटीस प्रतिवादीने हरकत अडथळा करु नये अशी निरंतर मनाईची मागणी मिळण्यास पात्र आहे. वादीने प्रतिवादीने दावा मिळकतीवर वित्तीय संस्थेचा अगर बँकेचा बोजा निर्माण करु नये अशी देखील निरंतर मनाईची मागणी केली आहे. परंतु या मुद्यावर वादीने कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. प्रतिवादी दावा मिळकतीवर बोजा निर्माण करायच्या तयारीत आहे अगर त्याने तसा प्रयत्न केला आहे असे देखील वादीचे दाव्यात अगर पुराव्यात कोणतेही कथन नाही. त्यामुळे दावा मिळकतीवर बोजा निर्माण करु नये अशी निरंतर मनाईची दाद मिळण्यास वादी पात्र नाही. म्हणून मी मुद्दा क्र.३ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवुन, मुद्दा क्र.४ करिता खालील आदेश पारीत करते.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | दावा खर्चासहित अंशतः मंजुर करण्यात येतो. |
| २. | दावा मिळकतीतील वादीच्या कब्जेवहिवाटीस प्रतिवादी अगर प्रतिवादीतर्फे अन्य व्यक्ती यांनी हरकत अडथळा करु नये अशी निरंतर मनाई प्रतिवादीस देण्यात येते. |
| ३. | येणेप्रमाणे हुकुमनामा करणेत यावा. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2026.07.07 17:34:23 +0530

**(प्राजक्ता राजीव सबनीस),**

**दि.०७/०७/२०२६** **३रे सह.दिवाणी न्यायाधीश क. स्तर, इंदापूर,**

**ता.इंदापूर, जि.पुणे.**

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. File judgment are same as per original judgment."

| | |
|---|---|
| **Name of Steno** | Shri. Kadam S.G. |
| **Court Name** | Smt.Prajakta Rajiv Sabnis 3rd Jt.CJJD. and JMFC, Indapur, Dist.Pune. |
| **Date** | 07/07/2026 |
| **Judgment signed by presiding officer on** | 07/07/2026 |
| **Judgment uploaded on** | 07/07/2026 |